सुधारणा व पुनर्वसन
Tel.No. : (020) 26124815
Fax No.: (020) 26125878
Email ID : igoffice.jud.mh@gov.in
Website:www.mahaprisons.gov.in

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**अपर पोलीस महासंचालनालय व महानिरीक्षनालय,**
**कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,**
**जुनी मध्यवर्ती इमारत,२ रा मजला,**
**पुणे ४११ ००१**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक**

**सन्मा.उच्च न्यायालयीन प्रकरण/अत्यंत महत्वाचे**

जा.क्र.न्यावि/सन्मा.उच्चन्याया/संचित-अभिवचन/पोलीसअहवाल/७६५९/२२,कक्ष-९(१०),दि.११.०८.२०२२

**विषय :- कारागृहातील बंद्याच्या संचित/अभिवचन रजा प्रकरणी जामीनदार बाबत..**

**संदर्भ :-** (१) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.पोमसं/२२/संचित-अभिवचन/फरारबंदी अटक/३९७/२०१७-२२ दिनांक १०/०८/२०२२

(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे कडिल फौजदारी रिट याचिका क्र. २०४/२०२२, ७०४/२०२२, ९७२/२०२२ व २१०४/२०२२ मधील दिनांक ०५/०८/२०२२ रोजीचे निर्देश.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे कडिल फौजदारी रिट याचिका क्र. २०४/२०२२, ७०४/२०२२, ९७२/२०२२ व २१०४/२०२२ मधील न्यायनिर्णय दिनांक १५/०७/२०२२

(४) शासन गृह विभाग परिपत्रकक्र.पीएआर सीओटी १००८/प्र.क्र.६०५/पीआरएस-३ दिनांक १६/१२/२००८.

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील फौजदारी याचिका क्र.२०४/२०२२, ७०४/२०२२, ९७२/२०२२ व २१०४/२०२२ मधील न्यायनिर्णय दिनांक १५/०७/२०२२ व दि.०५/०८/२०२२ अन्वये दिलेल्या आदेशात असे निदर्शनास आणले आहे की, संचित / अभिवचन रजा मंजूर करताना सक्षम प्राधिकारी (विभागीय आयुक्त/ कारागृह उपमहानिरीक्षक/ कारागृह अधीक्षक) हे जामीनदारांना परस्पर विरोधी व क्षुल्लक कारणास्तव अपात्र ठरवतात.

**उदा :-**

**१.** जामीनदार शहराच्या बाहेर धंदा व कामापोटी प्रवास करत असल्याने बंद्यावर नियंत्रण ठेऊ शकणार नाही.

**२.** जामीनदार हा काम करत नसल्याने आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही. तसेच हमीदारास आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी काम करावे लागेल व त्यासाठी त्यास घर सोडावे लागेल.

**३.** हमीदार हे खाजगी नोकरी करतात आणि / किंवा ते मालमत्तेचे सहमालक आहेत आणि पूर्ण मालक नाहीत.

उक्त संबंधी मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रं.३९७/२०१७-२२ दि.१०/०८/२०२२ अन्वये मा.उच्च न्यायालयाचे आदेशामधील संचित/ अभिवचन रजेसंदर्भात पोलीस चौकशी अहवाल सादर करणेबाबत सर्व घटक प्रमुखांना निर्देश दिले आहेत की, पोलीस चौकशी अहवालातील अंतिम निष्कर्ष हा स्पष्ट कारणेमिमांसेसह व त्याबाबतीतील सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह पाठविण्यात यावेत.

**(ब)** संदर्भ क्र .१ चे अनुषंगाने सक्षम जामिनदार संदर्भात पोलीस चौकशी अहवालामध्ये अभिप्राय देतांना प्रामुख्याने यासोबत जोडलेल्या यादीतील १८ म्हणजे ठराविक कारणे नमुद करण्यात येतात असे निदर्शनास आले आहे. तथापि, उक्त संदर्भ क्रमांक ०४ मधील नमुद मा.उच्च न्यायालयाने क्रिमिनिल याचिका क्रमांक २०४/२०२२, ७०४/२०२२, ९७२/२०२२ आणि २१०४/२०२२ हया फारुख शेख, सद्दाम हुसेन नजीर देसाई, सरफराज शेख आणि स्वप्निल खाटपे यांनी केलेल्या याचिका मध्ये दिनांक १५ जूलै २०२२ रोजी निर्गमित केलेले आदेशाचे याबाबतीत अवलोकन करण्यात यावे. त्यामध्ये परिच्छेद क्रमांक ४ आणि ५ मधील मा.उच्च न्यायालयाचे निरीक्षणाकडे राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांचे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यामुळे महाराष्ट्र कारागृह नियम, १९५९ (सर्व सुधारणांसह दिनांक १६.०४.२०१८) मधील नियम ६ चे ज्याप्रमाणे निर्वचन मा.उच्च न्यायालयाने केले आहे, त्यानुसार सक्षम जामिनदाराच्या बाबतीत पोलीस चौकशी अहवालात स्पष्ट अभिप्राय असणे आवश्यक आहे.

यास्तव सन्मा.न्यायालयाचे निर्देश व मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील सूचनांचे अनुषंगाने सर्व सक्षम प्राधिकारी (विभागीय आयुक्त/ कारागृह उपमहानिरीक्षक/ कारागृह अधीक्षक) यांना सुचित करण्यात येते की, केवळ मा.उच्च न्यायालयाने नमुद केलेले उक्त तीन मुद्दे किंवा मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रकामधील अठरा मुद्दयांच्या अनुषंगाने संचित/ अभिवचन रजा नामंजूर करण्यात येऊ नये.

**सोबत :-** संदर्भ क्र.०१ चे परिपत्रकाची छायांकित प्रत.

**(सुनिल रामानंद)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)
३. कारागृह अधीक्षक (सर्व)

**माहितीस्तव :-**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (अ व सु), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. प्रबंधक, सन्मा.उच्च न्यायालय, (अपिलेट साईड) मुंबई.
४. श्रीमती.अरुणा पै, मुख्य शासकीय अभियोक्ता, सन्मा.उच्च न्यायालय (अपिलेट साईड) मुंबई.